क्रमांक : एलएनडी-२६१४/६१२/प्र.क्र. ५३५७/ज-३
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक :- १ जून, २००६.**

**विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
**मौजे माहूल येथील नभूक्र. ४८३ मधील उपलब्ध असलेली जमीन हिंदूस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड , सिक्युरिटी सर्व्हीसेस कंन्सेप्ट आणि आता टिचर्स पेरेंट एज्युकेशन सोसायटी या संस्थांना ट्रक व टँकर्स पार्कीग/ वाहनतळासाठी ( पे अॅन्ड पार्क ) मंजूर करणेबाबत.**

**ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयासंबंधीच्या त्यांच्या क्रमांक-कार्या-३डी/वशी/६५०/९४, दि. १३/९/१९९४ व क्रमांक- सी/कार्यासन-२/बी/कावि/७२६/०१/एसआर-३३१, दिनांक १४/७/२००३ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, हिंदूस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, सिक्युरिटी सर्व्हीसेस कंन्सेप्ट आणि टिचर्स पेरेंट एज्युकेशन सोसायटी या संस्थांनी ट्रक व टँकर्स पार्कीग/ वाहनतळासाठी ( पे अॅन्ड पार्क ), मौजे माहूल येथील नभूक्र. ४८३ मधील जमीन मिळण्याची विनंती केली होती. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

मौजे माहूल येथील न. भू. क्र. ४८३ मधील उपलब्ध असलेली पट्टीवजा २५१७८.३ चौ.मी. जमिनीमधील नियोजित २७.४५ मीटर रुंदीच्या रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र वगळून, उर्वरीत जमिनीचे वितरण, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ मधील नियम ३४ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक लिलावाद्वारे ( upset price ) ठरवून पाच वर्षांच्या भाडेपट्टयाने नवीन शर्तीवर भोगवटदार वर्ग-२ या धारणाधिकारावर नेहमीच्या तसेच खालील अतिरिक्त अटींवर , वाहनतळासाठी करण्यात यावे.

**अटी :-** १) सदर योजनेमुळे वाहतुकीस कोणत्याही प्रकारची अडथण निर्माण झाल्यास लोकहितार्थ नाहरकत प्रमाणपत्र ( आदेश ) रद्द करण्याचे अधिकार वाहतुक विभाग त्यांच्याकडे राखून ठेवत आहे.

२) वाहनतळ तसेच वाहनाचे आगमन / निर्गमनाचे मार्ग / पट्टे / बाण यांच्या सहाय्याने स्पष्ट करण्यात यावे.

३) सदरची योजना राबविण्याकरीता प्रतिग्राहीता संस्थेने / कंपनी यांनी कर्मचा-यांची नेमणूक करावी व या कर्मचा-यांना वाहनतळावर वाहने व्यवस्थित लावून घेणेकरीता तसेच वाहनचालकांना वाहन विनाविलंब आतबाहेर येऊन जाण्यास मार्गदर्शन करण्याकरीता प्रशिक्षीत करण्यात यावे.

४) सदरची सुविधा फक्त प्रतिग्राहीता संस्था / कंपनी यांजकडे येणा-या वाहनाकरीता मर्यादीत न ठेवता इतर सर्व वाहनाकरिता खुली असावी. ही सुविधा सशुल्क असावी.

५) सुरुवातीस ही योजना प्रायोगिक तत्वावर असेल.

६) जमिनीपासून मिळणारी भाडेपट्टयाची रक्कम / महसूल नियम ३५ अन्वये दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयापेक्षा कमी असणार नाही.

कमाप...

Scanned by CamScanner

७) प्रतिग्राहित्यास यासंबंधात शासन स्तरावर वेळोवेळी घेण्यात येणारे धोरणात्मक निर्णय मान्य व बंधनकारक असतील.

८) संदर्भाधिन जागेवर जाहिरात फलक लावण्याची परवानगी देण्याचे व त्याचे उत्पन्न प्राप्त करण्याचे सर्व अधिकार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे राहतील.

२. हे ज्ञापन नगर विकास विभाग, गृह विभाग यांच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र.क्र. १२००/०३/व्यय-९, दि. १९/१/२००४ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,प्रशासकीय इमारत,
वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१.

प्रतिलिपी :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण विभाग, मुंबई.
३) महालेखापाल १/२ ,महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४) महालेखापाल १/२ ,महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर(लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण, मुंबई.
६) नगर विकास विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
७) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) वित्त विभाग, (व्यय -९) मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com


क्र. :-सी/कार्या-३डी/एल-

दिनांक :- /२/२००८

12 FEB 2008

## -: जाहिर निविदा :-

मौजे माहूल ता. कुर्ला, न.भू.क्र. ४८३ मधील उपलब्ध असलेली पट्टीवजा २५१७८.३ चौ.मी. जमीनीमधील नियोजित २७.४५ मीटर रुंदीच्या रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र वगळून उर्वरित जमीनीचे वितरण महाराष्ट्र जमिन महसूल(सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३४ मधील तरतूदीनुसार सार्वजनिक लिलावाद्वारे (Upset Price ) ठरवून पाच वर्षांच्या भाडेपट्ट्याने नवीन शर्तीवर भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकार नेहमीच्या तसेच अतिरिक्त अटी व शर्तीवर वाहनतळासाठी (Pay and park) वितरित करणेसाठी शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलएनडी २६९४/६९२/प्र.क्र. ५३५७/ज-३ दि.१/६/२००६ अन्वये मंजुरी दिली आहे.

सुरुवातीस ही योजना प्रायोगित तत्त्वावर असून प्रश्नांकित जागेची (Upset Price ) रु. ५,९७०/- प्रती चौ.मी. इतकी असून त्याचे भाडेपट्ट्याची रक्कम त्या त्या वर्षाच्या स्टेट बँकेच्या प्राईम लॅण्डींग रेटप्रमाणे असून त्या जागेचे पाच वर्षांचे भाडे हे (Upset Price ) म्हणून ठरविर्णेत आलेले आहे. सदरची (Upset Price ) एकरकमी या कार्यालयात जमा करावी लागेल. बोलीदारास शासनाच्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

त्या अर्थी, याद्वारे नोटीस देण्यांत येते की, ज्यांना वरील लिलावामध्ये स्वारस्य असेल त्यांनी दि.२७/२/२००८ पुर्वी त्यांच्या निविदा या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दि.२७/२/२००८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. आणि त्या अर्थी, विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा या कार्यालयात दि.२९/२/२००८ रोजी ठिक ३.०० वाजता उघडर्णेत येवून उच्चतम बोलीदारास जागा मंजूर प्रयोजनार्थ वापर करर्णेस वितरीत करर्णेत येईल.

टिप :- १) ज्यांच्या निविदा सदरहू कालावधीत विहित वेळेपुर्वी प्राप्त होणार नाहीत त्यांच्या निवादांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

Scanned by CamScanner

२) कोणतेही कारण न देता सदरच्या जाहिर निविदा/नोटीसीमध्ये फेरफार करणें, बदल करणें अथवा रद्द करणेंबाबत या कार्यालयाचा हक्क कायम राहिल. त्याबाबत बोलीदारास कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

३) सदरची जाहिर निविदा शासन महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र. एलएनडी २६९४/६९२/प्र.क्र.५३५७/ज-३ दि.१/६/२००६ ला अनूसरुन प्रस्तूत केली आहे.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रतिलिपी :(१) मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि.
२) सिक्युरिटी सर्व्हिसेस कंन्सेप्ट
३) टिचर्स पेरेंट एज्युकेशन सोसायटी
४) तहसिलदार, कुर्ला/नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांजकडे माहितीकरीता
२/- सोबत जाहिर नोटीसीच्या दोन प्रती पाठवित आहोत. त्यापैकी एक जाहिर नोटीस त्यांनी त्यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व एक जाहिर नोटीस संबंधीत जागेवर प्रसिध्द करावी व त्याचा पंचनाम्यासह अहवाल या कार्यालयास दोन दिवसात सादर करावा.
५) उपविभागीय अधिकारी, मुबई उपनगर जिल्हा यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरीता रवाना.
६) शासन महसूल व वन विभाग यांचेकडे माहितीकरीता सविनय सादर.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

Scanned by CamScanner